सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

## जिल्हाधिकारी, ठाणे यांजकडून
## प्रारुप अधिसुचना

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील निर्णय प्राफेब - २०१० (तलाठी)/प्र.क्र. ११२ (भाग-३)/म-१०, दि. २५/०५/२०१७ अन्वये राज्यातील वाढती लोकसंख्या व वाढते नागरीकरण या अनुषंगाने क्षेत्रीय महसूल यंत्रणेच्या कामात झालेली वाढ विचारात घेता राज्यात एकूण ३१६५ नवीन वाढीव तलाठी साझे व ६ तलाठी साझांसाठी १ महसूली मंडळ या तत्वाप्रमाणे सदर वाढीव तलाठी सझांसाठी ५२८ नवीन महसूली मंडळे स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांनी त्यांचेकडील सुधारीत पत्र क्र. मशा/कार्या-५/प्रशासन/तलाठी सजा निर्मिती/२०१७, दिनांक ३०/०६/२०१७ व अंतिम सुधारीत पत्र दिनांक ०७/०७/२०१७ अन्वये ठाणे जिल्ह्यासाठी ७२ नव्याने निर्माण होणाऱ्या तलाठी साझांची संख्या निश्चित करुन दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील पत्र क्रमांक सामान्य/का-१/टे-३/आस्था/तलाठी पुनर्रचना/कावि-७/२१७, दिनांक ३०/०६/२०१७ अन्वये साझांची फोड / पुनर्रचना करणेकामी नवीन साझांबाबतचे नकाशे व सीमा निश्चित करणे व नवीन साझांचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी असावे, या सर्व बाबींचा सविस्तर अहवाल सादर करणेकरिता दिनांक २५ मे २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २ (२) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उपविभागनिहाय उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन त्यांचेकडून ठाणे जिल्ह्यातील उपविभाग निहाय होणाऱ्या साझांची फोड / पुनर्रचना याबाबत साझांची निश्चिती करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, १) उपविभागीय अधिकारी ठाणे यांचेकडील पत्र क्रमांक क्र.टिडी/टे-१/आस्था/साझा पुनरर्रचना प्रस्ताव/कावि-४५१९/२०१७/४९३३/५७७४४/२०१७, दि. ०१/०९/२०१७ , २) उपविभागीय अधिकारी भिवंडी यांचेकडील पत्र क्रमांक क्र बीडी/महसुल/टे-३/आस्थ/कावि/९/१७, दि. ०१/०९/२०१७ , ३) उपविभागीय अधिकारी कल्याण यांचेकडील पत्र क्रमांक /के.डी./टे-५/आस्थापना/त.स. पुनर्रचना/कावि-०८/१७, दि. ३०/०८/२०१७ , ४) उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचेकडील पत्र क्रमांक क्र.टे-२/आस्था/तलाठी पुनर्रचना/कावि-३६३/१७, दि. ३१/०८/२०१७ अन्वये उपविभागातील ठाणे, भिवंडी, शहापूर, कल्याण, उल्हासनगर, मुरबाड, अंबरनाथ तालुक्यातील साझा पुनर्रचनेबाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जमीन महसून संहिता, १९६६ चे कलम ४, पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी, डॉ. महेंद्र कल्याणकर जिल्हाधिकारी ठाणे, ठाणे जिल्ह्यातील तलाठी साझांची पुनर्रचना करण्याबाबतच्या अधिसूचनेचा प्रारुप मसुदा याद्वारे प्रसिद्ध करीत आहे. तरी याबाबत ज्यांना कोणाला हरकत किंवा सूचना करावयाची असेल त्यांनी सदरची हरकत किंवा सूचना योग्य त्या कारणांसह लेखी स्वरुपात दि.२९/०९/२०१७ पर्यंत जिल्हाधिकारी ठाणे येथे दाखल करावी.

सोबतच्या अनुसूची - अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी ठाणे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर यामधील पुनर्रचित नियोजित / प्रस्तावित तलाठी साझांचा तालुकानिहाय तपशील पुढीलप्रमाणे असेल.

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे - ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ - २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in